Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 19 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १९ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

एक देश एक निवडणूक संदर्भातल्या दोन विधेयकांवर विचारविनिमय करण्यासाठी ३१ सदस्यांच्या संयुक्त संसदीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीत लोकसभेचे २१ आणि राज्यसभेचे दहा खासदार असतील. भाजप नेते पी पी चौधरी, अनुराग सिंग ठाकूर, पुरुषोत्तम रुपाला यांच्यासह काँग्रेस नेते प्रियांका गांधी, मनिष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांचा या समितीमध्ये समावेश आहे.

****

पुणे आणि नाशिक दरम्यान रेल्वे संपर्क वाढवण्याच्या दृष्टीनं २४८ किलोमीटर लांबीच्या दौंड-मनमाड मार्गाच्या दुहेरीकरणाच्या कामाला मंजुरी देण्यात आली आहे. यातील १७८ किलोमीटरचं काम यापूर्वीच सुरू करण्यात आलं असल्याची माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. याशिवाय नाशिक-साईनगर शिर्डी, पुणे-अहमदनगर दरम्यान नवीन दुहेरी मार्ग आणि साईनगर शिर्डी-पुणतांबा दरम्यान नवीन दुहेरी मार्गासाठी सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आल्याचं ते म्हणाले.

****

राष्ट्रीय न्यायवैद्यक पायाभूत सुविधा विकास उपक्रमांतर्गत पुण्यासह आणखी सहा ठिकाणी केंद्रीय न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा उभारण्यास सरकारनं मंजुरी दिली आहे, अशी माहिती केंद्रीय गृहराज्य मंत्री बंदी संजय कुमार यांनी काल राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली.

****

मुंबईत गेट वे ऑफ इंडियावरून एलिफंटाला निघालेल्या बोटीला उरण इथं झालेल्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला. मृतांमधे १० नागरिक आणि नौदलाच्या तीन

कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या कुटुंबियांना पंतप्रधान मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५ लाख रुपयांची मदत त्यांनी जाहीर केली असून, या घटनेची नौदल आणि राज्य सरकारमार्फत चौकशी केली जाईल, असं सांगितलं आहे.

****

अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि भाजपाचे प्रदेश सरचिटणीस रणधीर सावरकर यांची महाराष्ट्र विधानसभेत भाजप मुख्य प्रतोदपदी निवड करण्यात आली आहे. विधीमंडळ सचिवालयाने यासंदर्भातलं पत्र जारी केलं.

****

आगामी नव्या वर्षामध्ये एसटीच्या ताफ्यात साडे तीन हजार साध्या "लालपरी" बसेसचा समावेश होणार आहे. एसटी महामंडळाचे अध्यक्ष आणि मंत्री भरत गोगावले यांनी काल नागपूर इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सध्या एसटीच्या ताफ्यात १४ हजार बसेस आहेत, मात्र जुन्या बस नादुरुस्त होण्याचं वाढतं प्रमाण आणि बसेसची कमतरता, या पार्श्वभूमीवर एसटीने सुमारे २२०० बसेस खरेदी करण्याचा तसंच १३०० बसेस भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती गोगावले यांनी दिली. एसटी प्रवास भाड्यात साडेचौदा टक्के वाढ प्रस्तावित असून, बसस्थानकाची सुधारणा बीओटी तत्त्वावर केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआयनं सामुहिक भ्रष्टाचार प्रकरणी काल मुंबईतून सात सरकारी अधिकाऱ्यांना अटक केली. त्यांच्या कार्यालयांमध्ये आणि निवासस्थानी घातलेल्या छाप्यात २७ स्थावर मालमत्तांच्या कागदपत्रांसह एक कोटींपेक्षा जास्त रोख रक्कम ताब्यात घेण्यात आल्याचं सीबीआयनं सांगितलं. सीप्झमधलं जागा आरक्षण, आयात मालाचं वितरण आणि अन्य गैरव्यवहारांसाठी मध्यस्थांमार्फत लाच घेतल्याचा आरोप या अधिकाऱ्यांवर ठेवण्यात आला आहे. सह विकास आयुक्त, उप विकास आयुक्त आणि दोन सहायक विकास आयुक्तांचा यामध्ये समावेश आहे.

****

राष्ट्रीय तपास यंत्रणा – एनआयएनं काल आंतरराज्य शस्त्रास्त्र तस्करी प्रकरणी चार राज्यांत छापे घातले. बिहारमध्ये १२, नागालँडमध्ये तीन तर हरियाणा आणि जम्मू

काश्मीर राज्यात प्रत्येकी एका ठिकाणी छापा घालून एनआयनं प्रतिबंधित शस्त्रास्त्रं, मोबाइल, मेमरी कार्ड्स आणि पेन ड्राइव्ह जप्त केले. यासह एक मोटार, सुमारे १४ लाख रुपये आणि काही कागदपत्रं ताब्यात घेण्यात आली आहेत.

****

गेल्या १५ दिवसांत कांद्याच्या दरात तब्बल १५०० ते २ हजार रुपयांची घसरण झाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी काल नाशिक जिल्ह्यातल्या उमराणे बाजार समितीत लिलाव बंद पाडले. यामुळे काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती, शेतकऱ्यांची समजूत काढल्यानंतर लिलाव पूर्ववत झाले.

****

केंद्रीय सार्वजनिक तक्रार निवारण तसंच निवृत्तीवेतन विभागामार्फत आजपासून सुशासन सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. या आठवड्यात आयोजित विविध शिबिरांमध्ये नागरिकांनी मोठ्यासंख्येने सहभागी होण्याचं आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

लातूर इथं दोन दिवसीय शॉर्ट फिल्म फेस्टिवलचं आयोजन करण्यात आलं आहे. २३ आणि २४ डिसेंबर रोजी होणाऱ्या या स्पर्धात्मक फेस्टिवलमध्ये शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरी, ॲनिमेशन आणि व्हिडिओ साँग आदी प्रकारांचा समावेश आहे. अभिजात फिल्म सोसायटी आणि दयानंद एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा महोत्सव सर्वांसाठी नि:शुल्क आहे.

****